**हमीपत्र**

मी ................................., वय...............वर्षे, राहणार......................... मे. ................... .................... (प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक कंपनीचे नाव) मध्ये .............................. या पदावर कार्यरत असून, या कंपनीने मला सदरचे हमीपत्र करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाने घेतलेल्या ठरावानुसार प्राधिकृत केले आहे (सोबत कंपनीच्या संचालक मंडळाचा ठराव जोडला आहे). त्यानुसार आज दिनांक...............२०१७ रोजी असे हमीपत्र लिहून देतो की,

आम्ही ................. मे.वॅ. क्षमतेचा पवन ऊर्जा प्रकल्प गट नं. / सर्व्हे नं..........,. मौ............ ता............., जि............ येथे उभारला आहे. सदर पवनऊर्जा प्रकल्पाची उभारणी पूर्ण झाली असून, प्रकल्प दि................... रोजी महावितरण कंपनीकडून परस्पर कार्यान्वित करण्यात आला आहे. या हमीपत्राद्वारे मी कंपनीच्या वतीने अशी हमी देतो की सदर ठिकाणच्या पवनऊर्जा प्रकल्पाच्या प्रकल्प नोंदणीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे आम्ही सादर केलेली असून त्याबाबत व त्याच्या सत्यतेच्या आम्ही संपूर्ण जबाबदारी घेत आहोत. सदर प्रकल्प महावितरण कंपनीकडून परस्पर कार्यान्वित करण्यात आला असल्याने याबाबतचा दि. २१-१२-२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार आवश्यक असणारे शुल्क आम्ही महाऊर्जाकडे भरले आहे. या प्रकल्पासाठी आम्ही भरलेले हमीशुल्क हे नियमानुकूल शुल्क म्हणून गृहीत धरण्यात यावे व ते आम्हास परत मिळणार नाही याची आम्हास जाणीव असून त्यास आमची संमती आहे. तसेच आमचा प्रकल्प यापूर्वी कार्यान्वित झाला असल्याने दि. २१-१२-२०१६ च्या शासन निर्णयानुसार तो नियमित करून सदर प्रकल्पाची प्रकल्प नोंदणी करण्यात यावी. तथापि, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अथवा यापूर्वीच्या धोरणांतर्गत लागू असलेल्या सोयी सवलती म्हणजेच निष्कासन व्यवस्थेचा व पोहोच रत्याच्या खर्चाचा परतावा लागू असणार नाही याचीही आम्हास जाणीव आहे आणि ते आम्हाला मान्य आहे व आम्ही त्याची मागणी करणार नाही अशी हमी देतो.

या प्रकल्पासाठी लागणा-या जमिनीसंबंधातील सर्व कायद्यांचे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पथकिनारवर्ती नियमांचे व इतर अनुषंगिक सर्व कायद्यांमधील तरतुदींचे आम्ही काटेकोरपणे पालन करू. तसेच या कायद्यांमधील कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्यास व भविष्यामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद, आरोप, तक्रार निर्माण झाल्यास, त्याचे निराकरण करण्याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहील याची आम्हाला जाणीव असून ती बाब आम्हाला मान्य आहे. जमिनविषयक किंवा इतर कोणतीही वैधानिक परवानगी आमच्याकडून घ्यावयाची राहून गेली असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा आवश्यकता असल्यास किंवा कोणत्याही सक्षम प्राधिका-याने तसे निदेश दिल्यास अशी परवानगी प्राप्त करून घेणे आम्हाला बंधनकारक राहील. तसेच याबाबत शासन / महाऊर्जाने निदेश दिल्यास आम्ही त्याचे अनुपालन करू.

तसेच भविष्यामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद, आरोप व तक्रार निर्माण झाल्यास आणि त्यामध्ये शासन / महाऊर्जा अथवा अन्य सक्षम प्राधिकाऱ्याने आदेशित केल्यास आम्ही त्याचे विनातक्रार व विनाआक्षेप काटेकोरपणे अनुपालन करू.

दिनांक -

स्थळ -

मे. ................................................ यांचे
प्राधिकृत प्रतिनिधी